**दुरध्वनी क्र.२८१९३०८७,**
**अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (परवाना)**
**यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,**
**भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.**
**जा.क्र.माअधि/अपिल/१३/२०१९**
**दि.२८/०२/२०१९.**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (परवाना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.प्रशांत ज्ञानदेव पाटील, ................अपिलार्थी
पेणकर पाडा, गुरु सेवा चाळा, रुम नं.१,
श्रीपात सावंत मार्ग, निबादेवी रोड,
मिरारोड (पूर्व).

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
विभागप्रमुख, परवाना विभाग

## -: विवेचन :-

श्री.प्रशांत ज्ञानदेव पाटील यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख, परवाना विभाग यांचेकडे दि.२३/१०/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) साई दिप फ्लोअर मिल, पेणकरपाडा आस्थापनाने सर्वात प्रथम केव्हा परवान्याकरिता अर्ज केला. त्या अर्जाची व अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची व सदर परवाना शुल्क जमा पावतीची परवान्याची प्रमाणित प्रत.
२) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या फ्लोअर मिलसाठी परवाना देण्यासाठी आमलास असलेली मार्गदर्शन सूचना व नियमावलीची प्रमाणित प्रती.
३) साईदीप फ्लोअर मिल, पेणकरपाडा विरोधात पेणकरपाडा ग्रामस्थांना अर्ज केला असल्यास त्यांच्यावरती काय कारवाई केली गेली? व अर्ज दाखल केल्यानंतर आस्थापनासाठी साईदीप फ्लोअर मिलला परवाना देण्यात आला का? व कोणत्या नियमावली नुतनीकरण केले? कोणत्या अधिकाऱ्यांनी केले? नुतनीकरण करताना नियमाचे पालन केले का?

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**
माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.१२/०२/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (परवाना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**
अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख, परवाना विभाग यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.२८/०२/२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.परवाना/०२०/२०१९ दि.१८/०२/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख, परवाना विभाग हे निवडणूक कामकाजाकरिता गेले असल्याकारणाने सुनावणीस अनुपस्थित असुन अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.२३/१०/२०१८ रोजीच्या पत्रानुसार माहिती प्राप्त झालेली नाही.

२) **सहा.जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख, परवाना विभाग यांनी अपिलार्थी अर्जदारास १० दिवसांत विनाशुल्क माहिती उपलब्ध करुन द्यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (परवाना)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रतिः-**

१) श्री.प्रशांत ज्ञानदेव पाटील,
पेणकर पाडा, गुरु सेवा चाळा, रुम नं.१,
श्रीपात सावंत मार्ग, निबादेवी रोड,
मिरारोड (पूर्व).

२) जन माहिती अधिकारी तथा
विभागप्रमुख (परवाना)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (परवाना) यांचे कार्यालय.